| MHBI110041902025 | **दिवाणी किरकोळ अर्ज नं. १०३७/२०२५ मधील नि.क्र.०१ खालील आदेश** |
|---|---|

१] अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज वारसा दाखला मिळणेसाठी केलेला आहे. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, तिची आई नामे **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** ही दि.१३/०८/२०२५ रोजी गेवराई, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाली आहे. अर्जदारास शासकिय व निमशासकिय रेकॉर्डला मयताचे वारस म्हणुन वारसा आधारे नाव लावण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराने **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांचे एकमेव कायदेशीर वारस असलेबाबत वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल आहे.

२] सदरकामी दि.०७/०१/२०२६ चे 'दै. समर्थ राजयोग' मध्ये जाहिरनामा प्रसिद्ध करुन सुद्धा सदर अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. सबब, सदरचा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

३] अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझे विवेचनास उपस्थित होतात व मी त्यावरील निष्कर्ष त्या खाली नमूद कारणमिमांसावरुन नोंदवत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही सिध्द करते काय की, ती मयत **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांची कायदेशीर वारस आहे ? | होय |
| २ | अर्जदार ही सिध्द करते काय की, मयत **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** ही दि. १३/०८/२०२५ रोजी विना-मृत्युपत्र मयत झाली आहे ? | होय |
| ३ | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.12 17:11:16 +0530

## कारणमिमांसा

**मुद्दा नं.१ ते ३ करीता–**

४] अर्जदार हिने तिचे मागणीचे पृष्ठयर्थ नि.क्र.११ ला पुराव्याचे शपथ पत्र दाखल केले आहे. तिने तिच्या शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. अर्जदाराने **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांचे मृत्यूप्रमाणपत्र नि.क्र.६ वर दाखल केले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ ला जादा पुरावा देणेचा नाही अशी पुरशिस दाखल केली आहे.

५] हिंदु वारसा कायदा १९५६ चे कलम १५ अन्वये हिंदु स्त्रीच्या निधनानंतर तिची मालमत्ता कलम १६ वर नमूद केलेल्या नियमानुसार वितरीत केली जाते. कलम १५ नुसार मालमत्ता सर्वप्रथम मुलगे किंवा मुली (कोणत्याही पुर्वमृत मुलाच्या किंवा मुलीच्या मुलांसह) आणि पतीवर, त्यानंतर पतीच्या वारसांवर त्यानंतर आई वडीलांवर त्यानंतर वडीलांच्या वारसांवर आणि सर्वात शेवटी आईच्या वारसांवर वितरीत केली जाते.

६] बॉम्बे रेग्लुलेशन VIII चे कलम २ अन्वये मयताच्या वारसांना त्यांचा मयताच्या बाबतचा औपचारीक हक्क न्यायालयाकडून मान्य करुन घ्यावयाचा असल्यास ते अर्ज करु शकतात. तसेच उदघोषनेच्या कालावधीनंतर आणि कुठलेही आक्षेप आलेले नसल्यानंतर न्यायालय मयताच्या वारसांबाबतचा पुरेसा पुरावा अभिलेखावर Appendix B अन्वये मयतांच्या वारसांना ते मयताचे औपचारीक वारस असल्याचे प्रमाणपत्र जाहीर करु शकते.

७] प्रकरणातील दाखल कागदपत्रे, सत्यप्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता असे निर्देशनास येते की, अर्जदार मुलगी या नात्याने मयत **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांची कायदेशीर वारस आहे. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी देवुन मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार हीच मयत **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांची कायदेशीर वारस आहे, असे जाहीर करण्यात येते.

SHRUTI HANUMANTRAO PATIL Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL Date: 2026.03.12 17:11:21 +0530

३. अर्जदार हीच मयत **लक्ष्मीबाई भ्र. गंगाधर मोटे** यांची वारस असलेने विहीत कारणासाठी वारस दाखला त्यांना विहीत न्यायशुल्क भरल्यानंतर प्रदान करणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.12 17:11:26 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. १२/०३/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**गेवराई.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 12.03.2026 |
| Transcribed on | :- | 12.03.2026 |
| Checked & Signed on | :- | 12.03.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer (G-3)